एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना

(योजनेअंतर्गत डायलिसिस उपचार पूर्णपणे मोफत)

उद्देश- दीर्घकालीन मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णाला डायलिसिस सुविधा पुरविणे.

लाभार्थी (महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना) -

1) पिवळे, अंत्योदय, अन्नपूर्णा, केशरी शिधापत्रिका धारक कुटुंबे

2) अवर्षणग्रस्त जिल्ह्यातील शुभ्र शिधापत्रिका धारक शेतकरी कुटुंबे

3) शासकीय आश्रम शाळेतील मुले, शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थी, शासकीय महिलाश्रमातील महिला, शासकीय वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिक, माहिती व जनसंपर्क संचालनालयाने मान्यता दिलेले पत्रकार व त्यांची कुटुंबे, बांधकाम कामगार व त्यांची कुटुंबे .

लाभार्थी (प्रधानमंत्री जन आरोग्य योजना) - आयुष्मान कार्ड व फोटो ओळखपत्र

निःशुल्क सेवा व सुविधा

- सर्व हिमोडायलेसीस उपचार
- आवश्यक तपासण्या
- डायलायझर,
- ट्युबिंग
- फिस्टुला नीडल
- इंजेक्शन
- एरीथ्रोपोईटिन
- औषधे
- वैद्यकीय सल्ला इत्यादी

आतापर्यंत ५.८७ लाखाहून अधिक डायलिसिस उपचार

- संपूर्ण महाराष्ट्रात डायलिसिससाठी अंगीकृत रुग्णालय व सेंटर

४८५

- आजतागायत अदा केलेले एकूण दावे

५६२ कोटी

योजनेअंतर्गत सर्व डायलिसिस विनामूल्य

"जनआरोग्य योजनेतून करूया उपचार आता पैशाचं भार घेईल सरकार

राज्य आरोग्य हमी सोसायटी
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन.

मोफत डायलिसिस घेण्यासाठी

अंगीकृत रुग्णालयातील मदत केंद्र (Kiosk) ला भेट देणे -

- वैध शिधापत्रिका व फोटो ओळखपत्रासह मदत केंद्रास भेट देणे.
- आरोग्यमित्राकडून संपूर्ण माहिती घेणे.
- अधिक माहितीसाठी योजनेच्या वेबसाईटला भेट देणे व योजनेच्या टोल फ्री नंबर वर संपर्क साधणे.

तुम्हाला माहिती आहे का ?

- डायलिसिससाठी असेलेल्या सर्व अंगीकृत रुग्णालय व सेंटर वर डायलिसिस मोफत केले जातात.
- या योजनेअंतर्गत रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यावर रुग्णास परतीचा एस.टी. किवा रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाच्या प्रवासाचा खर्च मिळतो.

तक्रार असल्यास ?

- डायलिसिसवरील उपचार पूर्णपणे मोफत असल्यामुळे कोणत्याही रुग्णाने हॉस्पिटल/ केंद्राला पैसे देऊ नयेत.
- पैसे मागितल्यास योजनेच्या खाली दिलेल्या कॉल सेंटरच्या टोल फ्री नंबर वर संपर्क साधावा.

संपर्क साधा

१५५३८८/१८००२३३२२०० - १४५५५/१८००१११५६५

www.jeevandayee.gov.in

freedialysis@jeevandayee.com

राज्य आरोग्य हमी सोसायटी अंतर्गत ,

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत १२०९ उपचारांकरिता प्रति कुटुंब प्रति वर्ष रु. ५ लक्ष वैद्यकीय संरक्षण, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये ९९६ उपचारांकरिता प्रति कुटुंब प्रति वर्ष रु. १.५ लक्ष पर्यंतचे विमा संरक्षण (मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी - रु. २.५ लक्ष पर्यंतचे विमा संरक्षण) प्रति कुटुंब, प्रति वर्ष